# ग्रंथालयामध्ये इंटरनेटचा उपयोग

**डॉ . सुनील ह . उरकुडकर**
ग्रंथपाल
कला व वाणिज्य महाविद्यालय, पुलगाव .
sunil1urkudkar@gmail.com

**प्रस्तावना**

सुरुवातीच्या काळामध्ये इंटरनेटचा वापर हा देशाच्या सरक्षणासबंधी गुप्त माहिती हाताळण्याकरिता करण्यात येत होता . कालांतराने इंटरनेट सेवा ही श्रीमंत व्यक्ती, उद्योगपती किंवा व्यापाऱ्यासाठी होता . परंतु आज ती समजूत चुकीची ठरली आहे . आज प्रत्येक ठिकाणी इंटरनेटचा वापर पाहायला मिळतो मग ते क्षेत्र कार्यालयीन असो, शैक्षणिक किंवा वैयक्तिक . आज प्रत्येक वयोगटातील व्यक्तीसाठी इंटरनेटचा वापर हा अविभाज्य भाग ठरला आहे . सध्या कोरोंना या विषाणूमुळे सर्वजण हे घरामध्ये बंदिस्त झाले होते, त्यामुळे कार्यालयीन कामकाज असो की शैक्षणिक किंवा खरेदी यासाठी इंटरनेट हा सर्वात सुखकर उपाय होता . इंटरनेट द्वारा हव्या त्या वस्तु हवे ते खाद्यपदार्थ रेसिपी, संगीताचा आस्वाद घेता येतो, थोडक्यात काय इंटरनेट आपले दैनदीन जीवन व्यापून पाहत आहे . परदेशातील शाळकरी मुले ज्या प्रमाणात इंटरनेट व मोबाईलचा वापर करतात त्या प्रमाणात आपल्या देशात एवढा प्रसार झालेला नव्हता, पण अलीकडे म्हणजे दोन वर्षामध्ये ऑनलाइन शिक्षण पद्धतीमुळे तो होतांना दिसतो आहे .

**इंटरनेटचा दैनदीन ग्रंथालयीन कामात उपयोग**

दैनदीन जीवनात इंटरनेटचा प्रभाव दिवसागणिक वाढतांना दिसतो आहे . व्यावसायिक कामे, बँकाचे व्यवहार, रेल्वे – विमान आरक्षणे, टेलीफोन किंवा विजेचा भरणा असो किंवा मुलांचे शालेय अभ्यासक्रम किंवा घरून केलेले कार्यालयीन कामकाज असो इंटरनेटच्या उपयोगाने पूर्वीपेक्षा सुकर व पारदर्शक झाली आहेत . इंटरनेटवरून माहिती मिळविणे सोपे असले तरी ती शोधण्यासाठी तुम्हाला तुमचे कौशल्य पणाला लावावे लागते . ग्रंथालय व महितीशास्त्राच्या विषयाच्या अभ्यासक्रमात इंटरनेट या विषयास अत्यंत महत्व आहे . विशेषत : मिळवणे, हाताळणे व योग्य त्या अपेक्षेप्रमाणे पुरविणे हे ग्रंथालयशास्त्रामध्ये महत्वाचे कार्य आहे . याचे मुख्य कारण म्हणजे माहिती तंत्रज्ञान हे सतत विकसित होणारे क्षेत्र आहेत . त्यामध्ये नवनवीन बदल घडत असतात व नवीन कार्यरत होत असतात . प्रत्येक महितीस्त्रोत वापरुन माहिती शोधणे हे आव्हानात्मक काम आहे . ग्रंथालयाच्या दैनदीन कामात संगणकाचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहेत . सार्वजनिक ग्रंथालय, शैक्षणिक, शालेय, संशोधन व विशेष ग्रंथालय प्रकार हे त्यास अपवाद राहणार नाहीत .

ग्रंथालयात इंटरनेटचा प्रथमदर्शनी उपयोग ग्रंथालयाची वेबसाईट, तालिका तसेच डिजिटल स्त्रोताचे ग्रंथालय यांची सुयोग्य मांडणी व सादरीकरणासाठि होतांना आपण पाहतो . ग्रंथालयामध्ये इंटरनेटचा वापर करणे म्हणजे वाचकांसाठी केवळ ई मेल करणे , चॅट करणे, क्रिकेट पाहणे, संगीत ऐकणे इत्यादि अनुत्पादन कामासाठी करतांना दिसतात . ग्रंथालयाच्या दैनंदिन कामामध्ये इंटरनेटचा वापर बऱ्याच कामामध्ये करता येतो त्यामध्ये फक्त आपले कौशल्य पणाला लावणे आवश्यक असते .

**उपार्जण कामात इंटरनेटचा वापर**

उपार्जण प्रक्रियेमध्ये नवीन ग्रंथ प्रकाशन संबंधित ग्रंथ उपलब्धता, त्यांची किंमत त्यांचे वितरक तसेच ग्रंथ खरेदी इत्यादीसारखी माहिती वारंवार लागत असते . तसेच परदेशी ग्रंथाबद्दल त्यांची गरज भासते . ऑनलाइन बूक शॉप साठी इंटरनेट हे एक पर्यायी साधन आहे . इंटरनेट द्वारे बुक्स ची नावे त्यांची किंमत, प्रकाशकाची माहिती, वितरकाची माहिती इत्यादीबद्दल माहिती मिळते .

**उपस्कार कामामध्ये इंटरनेटचा वापर**

ग्रंथालयामध्ये वर्गीकरण, तालिकीकरण तसेच विषयमथळे या कामाचा अंतर्भाव हा ग्रंथोपस्कार या भागामध्ये होतो. वर्गीकरण, तालिकीकरण या कामामध्ये सतत मार्गदर्शनपर माहितीची गरज असते. या कामामध्ये इंटरनेटचा वापर महत्वाचा असतो. ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध अशा वर्गीकरण पद्धतीच्या विषयस्थळे देणाऱ्या तसेच तालिकीकरनाचे नमुने उपलब्ध करणाऱ्या वेबसाईटचा समावेश होतो.

**देवघेव कामामध्ये इंटरनेटचा वापर**

आंतरग्रंथालयीन देवघेवीसाठी इंटरनेटचा वापर चांगला होतो. आपल्या ग्रंथालयामध्ये ज्या ग्रंथाची उपलब्धता आहे तो ग्रंथ संकेतस्थळावर शोधून त्या बद्दलची माहिती तुम्हाला मिळू शकते. त्या सबंधी चे पत्रे तुम्ही वितरकाला ई मेल पाठवून मागवु शकता. त्याच प्रमाणे ग्रंथालय सदस्यत्व, नूतनीकरण , ग्रंथ परत न करण्याबाबतची स्मरणपत्रे, देवघेव विभागाकडून प्रसारित केलेल्या सूचना, बातम्या, कार्यक्रमाची पत्रके ई. गोष्टी इंटरनेटच्या माध्यमातून करता येतात.

**इंटरनेटचा नियतकालिक विभागामध्ये उपयोग**

नियतकालिकासबंधी वारंवार लागणारी माहिती म्हणजे विशिष्ट विषयासंबधातील नियतकालिके शोधणे. नियतकालिका संदर्भात संपूर्ण माहिती जाणून घेणे उदा. नियतकालिकेचे प्रकाशक, त्यांचा पत्ता, आय.एस.एस. नंबर, नियतकालिकेचे प्रकार, वर्गणीची किंमत, वितरकाची माहिती तो वितरक आपल्या देशातील आहेत कि परदेशातील. सध्याचा काळ डिजिटल युगाचा आहे त्यामुळे बरेच नियतकालिक हे आपल्याला ऑनलाइन स्वरुपात मिळू शकतात, अश्यावेळी त्या संकेतस्थळाचा पत्ता माहिती असणे आवश्यक असते. या कामामध्ये इंटरनेटचा खूप प्रमाणात उपयोग होतो. त्याचप्रमाणे आंतरग्रंथालयीन लेखाच्या प्रतीची देवाणघेवाण प्रक्रियेसाठी इंटरनेट व ईमेल चा वापरही चांगल्याप्रकारे करता येतो.

**वायफाय तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात उपयोग**

ग्रंथालय इंटरनेटचा अभ्यास करताना दोन संगणकामधील दळणवळनासाठी वापरल्या जाणाऱ्या टेलिकम्युनिकेशन तंत्रज्ञानाचा अभ्यास केला. दळणवळण तंत्रज्ञानामध्ये खूप प्रगती झाले व त्याचा फायदा माहितीचे जलद प्रसारण होण्यास झाला आहे. जलद व प्रगत टेलीफोन सेवेबरोबरच डेटांचे स्वरूपातील प्रसारण व देवाण घेवाण आता जलद व सुलभ झाली आहे. ग्रंथालय व शिक्षण क्षेत्रात आता इंटरनेटचा वापर वाढतो आहे. वायरलेस तंत्रज्ञानाचा उपयोग मोबाइल तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी झाला आहे. आपल्या देशात ग्रंथालये, संशोधन प्रयोगशाळा , उच्च शिक्षनसंस्था यांच्या परिसरात वाय फाय झोन अस्तित्वात आणण्याचा प्रयत्न केला जातो. जेणेकरून त्या संस्थेतील प्राध्यापक, शास्त्रज्ञ व संशोधकांना संशोधनाचे काम आपल्या सोयीनुसार करणे शक्य होते. त्यासाठी ग्रंथालयाच्या परिसरात ॲटेना असणे आवश्यक असते.

**इंटरनेटचा संदर्भ व माहिती सेवेत उपयोग**

इंटेरनेटवरील उपलब्ध माहिती संदर्भ साधनांचा उपयोग संदर्भसेवेत करता येतो. सिलेक्टिव डिसमिनेशन ऑफ इन्फॉर्मेशन यासारख्या व्यक्तिकेंद्रित सेवा विभाग व प्रोजेक्ट–केंद्रीत माहिती –सेवा इंटरनेटचा आधार घेवून देता येतात. या विभागाशी निगडीत डिजिटल ग्रंथालय अंतर्गत आधुनिक माहिती स्त्रोतांची सूची बनवून वाचकांसाठी उपलब्ध करणे हे काम नव्याने सुरू आहे. ग्रंथालयास आंतरग्रंथालयीन सहकार्य कार्यक्रमांतर्गत ग्रंथालय नेटवर्कमध्ये भाग घेण्यासंबंधीची कामे करतांना सबंधित स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय ग्रंथालय नेटवर्कच्या वेबसाइटशी निगडीत कामे इंटेरनेटद्वारा करता येतात.

**निष्कर्ष**

माहितीच्या उपलब्धतेच्या दृष्टीकोनातून इंटरनेट आज एक उपयुक्त स्त्रोत म्हणून तसेच बाह्य माहिती स्त्रोतासाठी पायाभूत साधन म्हणून उदयास आलेले तंत्रज्ञान आहे. उद्यापासून ते आतापर्यंत इंटरनेट तंत्रज्ञान झपाट्याने विकसित होत आहेत. या तंत्रज्ञानात नवनवीन सुविधा उपलब्ध होत आहेत. कालच्या तंत्रज्ञानापेक्षा आजचे तंत्रज्ञान अधिक प्रगत स्वरूपात उपलब्ध होत आहेत. इंटरनेट सुरक्षेच्या दृष्टीकोनातून समस्या जाणून घेऊन योग्य ती खबरदारी घेणे अत्यंत आवश्यक झालेले आहे.

## संदर्भ

1. Alimahommadi, Dariash : Designing welbliographies in an effective and simpler manner : A Step process webliography, vol.1, No.1 August 2004.
2. Alimahommadi, D.webliography : Abrief report on an experience of the A.T.U. Informology 1(3)217-230,2004.
3. Harries : S.R. 0Webliography : A Porcess Of building Internet subject access. Acquisition Librarian, 17/18, 29-43, 1997.
4. Comer, Douglas E. Internet Book : Everything you msy need to know about computer networks, networking and how internet works? Englewood Chiffs : Prentice Hall ; 1995.
5. Dowson,Andy : Internet for library information science professionals, London : ASLIB ; 1997